ऐक्य
९३ वर्षांची वाचनीय परंपरा
www.dainikaikya.com सातारा सोमवार दि. १३/२/२०१७ email : news@dainikai

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# कोरेगाव येथील डी. पी. भोसले कॉलेजमध्ये आज राष्ट्रीय चर्चासत्र

**सातारा**, दि. १२ : रयत शिक्षण संस्थेच्या कोरेगाव येथील डी. पी. भोसले कॉलेजमध्ये सोमवार, दि. १३ रोजी मानसशास्त्र, शारीरिक शिक्षण व ग्रंथालय या विभागाच्यावतीने तीन राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदांचे उद्घाटन प्रसिध्द विचारवंत व मराठी साहित्यिक प्राचार्य, डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. दीनानाथ पाटील हे आहेत.

मानसशास्त्र विभागाच्यावतीने प्रसार माध्यमांचा तरूण पिढीवरील मानसशास्त्रीय प्रभाव, शारीरिक शिक्षण विभागाच्यावतीने 'स्वास्थ्य व कल्याण : समस्या व उपाय' या विषयावर तर ग्रंथालय विभागाच्यावीने शैक्षणिक ग्रंथालय व सेवा यामधील नवे बदलते प्रवाह या विषयावर चर्चासत्रे होणार आहेत. या चर्चासत्रासाठी डॉ. रवी गुंठे, जेएनयू, डॉ. गुरुनामसिंग हरियाणा विद्यापीठ, डॉ. सुनील सोनटक्के, डॉ. अतिश टोकरी, डॉ. सोपान बोराटे, डॉ. तानाजी हातेकर, प्रा. एम. बी. तोगंम, आनंद चौधरी, राहुल गाडेकर, डॉ. अरूण शिंदे, प्राचार्य डॉ. एन. डी. पाटील, डॉ. नितीन सोहनी, प्रा. संभाजी पाटील, डॉ. धनंजय सुतार, प्रा. शिवाजी लोखंडे व मान्यवर उपस्थित राहणार असून चर्चासत्रासाठी मुदतपूर्व १५३ संशोधक अभ्यासकांनी नावनोंदणी केली आहे. प्राचार्य डॉ. एन. डी. पाटील, प्रा. बाळासाहेब भोसले, प्रा. चंद्रशेखर खैरनार यांनी अशी माहिती दिली.